जुलै २०१५ | ₹ ४० | पुणे, वर्ष ५ | अंक ०८

# अर्थपूर्ण

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत

The entire world agrees that the existence of high denomination currency notes are very dangerous to nation's economy, especially developing countries like India. However, **in India, high value currency notes like 1000,500 & 100 contribute 93 % of total currency.** Our nation would like to know Why these high value notes are still existing in the currency.




## संवेदनशील आणि विचारी भारतीय नागरिकांना आवाहन

आपल्या आर्थिक तणावांचे कारण आपण काम करत नाही, हे नसून अर्थव्यवस्थेतील तांत्रिक दोष हे आहे, हे समजून घेऊ. आणि त्याच्या दुरुस्तीसाठी पुढाकार घेऊ...

चला मुंबईला रिझर्व बँकेत
१४ ऑगस्ट २०१५ ला...

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

editor.arthapurna@gmail.com

'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.
११, 'हर्षदा', रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे ४११०३८
**फोन : ०२०– २५४३०५४०**
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

**जुलै २०१५**

वर्ष पाचवे
अंक आठवा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
९८८१०९८०१०

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
०२०-२५४३०५४०
९९२१९२६५३८
arthapurna.monthly@gmail.com

**वितरण आणि जाहिरात संपर्क**
प्रशांत देशपांडे
९८५०२३३७७७
विजय दबडगावकर
९८९०१००९८४
राजन मिडिया स्टेशन
फोन ०२०-३०२९२४४४,
३०२९२४४५

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२, साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले.
संपादक : यमाजी मालकर

## अनुक्रमणिका

**०४ संवेदनशील आणि विचारी माणसांसाठी...**यमाजी मालकर
**०६ आर्थिक स्वातंत्र्य हाही जन्मसिद्ध हक्कच**
**०८ रोखीच्या कर्करोगावर इलाज !...**यमाजी मालकर
**१० मोठ्या नोटांचा इकॉनॉमिकल लोचा...**निलेश बने
**१६ अर्थक्रांतीच का ?**
**१८ अर्थपूर्ण बातम्या**
**२१ अर्थक्रांतीच्या दिशेने**
**२४ अर्थभान**
**२७ शेअरबाजारः 'बॉटम' ओळखण्याचे काही आडाखे...**प्रसाद भागवत
**३० सुदृढ लोकशाहीसाठी एक वेगळा प्रयत्न...**कल्याण वर्दे
**३३ 'अर्थक्रांती', 'अर्थपूर्ण'चे चंदेकाका...**यमाजी मालकर

# संवेदनशील आणि विचारी माणसांसाठी...



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**आपण संवेदनशील असाल तर आपल्याला सध्याच्या परिस्थितीची प्रचंड चीड येईल आणि आपल्यातला विचारी माणूस हे दोष कसे दूर करता येतील, यासाठीच्या प्रयत्नात भाग घेईल. अर्थक्रांतीचा विचार करायचा तो त्यासाठी. ज्याला हा विचार करणे, आज झेपते त्यांच्यासाठी हे आवाहन आहे. त्या दिशेने जाणारा असाच एक प्रयत्न म्हणजे सर्वांचे शोषण करणाऱ्या अधिक मूल्याच्या नोटा चलनातून बाद करणे. १०००, ५०० आणि १०० रुपयांच्या या नोटा भारतीय समाज पोखरून काढत आहेत. ते थांबविण्यासाठीची पहिली पायरी म्हणजे हे सर्व ज्या रिझर्व बँकेच्या अखत्यारीत आहे, तिलाच त्याविषयीचा जाब विचारायचा.**

एवढ्या मोठ्या जगात दररोज घडणाऱ्या उलाढालींचा हेतू नेमका काय आहे, असा एक माणूस म्हणून आपण विचार केला तर आपण, आपली पुढील पिढी आणि आपल्यासोबत या जगात असणाऱ्या माणसांना मानवी प्रतिष्ठा मिळवून देणे आणि आपल्या जीवनाची सन्मानाने अखेर होणे, याशिवाय वेगळे काही सापडत नाही. ज्याला मानवी प्रतिष्ठा म्हणता येईल; ती समाजाशिवाय मिळू शकत नाही आणि सन्मानाने मरण, हे पण समाजावरच अवलंबून आहे. अर्थात, ही पृथ्वी काही केवळ माणसांची नाही, त्यामुळे सर्व प्राणीमात्र आणि निसर्गाचा विचार केलाच पाहिजे, याविषयी दुमत नाही. मात्र येथे सोयीसाठी आपण सुरवातीस मानवाच्या प्रतिष्ठेविषयी बोलणार आहोत. कारण तीच प्रस्थापित करता आली नाही, तर निसर्गावर आणि प्राणीमात्रांवर प्रेम आहे, असे म्हणणे हे ढोंगच ठरते. मानवाचा आजपर्यंतचा प्रवास त्या ढोंगाला नकार देवून पृथ्वीतलावरील सर्वच आयुष्य समृद्ध करण्याचा राहिला आहे. मानवाचा हजारो वर्षांचा प्रवास त्यादिशेने सुरुच आहे आणि गेल्या काही शतकात त्याने वेग पकडला आहे. मात्र, हा वेग वाढविताना त्याने आपली ती दिशा बदलली आहे की काय, अशी शंका जगातील आजच्या घडामोडी पाहून वाटू लागली आहे.

आज जगात शांतता नांदते आहे, आजचे जग आधुनिक आहे, ते भौतिकदृष्टीने कधी नव्हे इतके श्रीमंत झाले आहे, ते काही चांगल्या व्यवस्थांनी बांधले गेले आहे, हे खरेच आहे. मात्र ते अर्धसत्य आहे. आता जगात थेट युद्ध होत नाहीत, आता जगात रानटी पद्धतींचे समर्थन होत नाही, ते सुखसोयींनी भरलेले आहे आणि लोकशाही व्यवस्थेचा आदर वाढला आहे, हे जेवढे खरे आहे, तेवढेच हेही खरे आहे की युद्ध असे नाव नसलेले इतके संघर्ष जगात सुरु आहे की ते सर्व एकत्र केले तर त्यात होणारी हानी युद्धापेक्षाही कितीतरी अधिक आहे. रानटी पद्धतीचे जाहीर समर्थन होत नसले तरी अमानवी म्हणता येतील, अशा हजारो घटना दररोज याच जगात घडत आहेत. सुखसोयी वाढल्या हे तर खरेच आहे, मात्र त्याच्या वाटपाचे प्रमाण एवढे व्यस्त आहे की निम्मी माणसे अजून प्राथमिक सुखसोयींसाठी दररोज धडपडत आहेत. लोकशाहीचा प्रवास आश्वासक खरा, पण तिच्या आडून शोषणाची एक साखळीच पुन्हा तयार होते आहे!

आधुनिक जगातील हे जे अर्धसत्य आहे, ते आज प्रत्येक संवेदनशील माणसाला त्रास देते आहे. मनात सलते आहे. त्याला जगताना एकटे वाटायला लागले आहे. त्याला आपल्या भविष्याची चिंता सतावू लागली आहे. आपल्या पुढील पिढीच्या आनंददायी जीवनाविषयी तो साशंक झाला आहे. आजूबाजूला नेमके काय बदलते आहे, याचा उलगडा होण्याआधीच माणूस त्यात फसत चालला आहे. भौतिकतेचा पुरस्कार करणाऱ्या पाश्चात्य संस्कृतीत

जगणाऱ्यांनाच हा अनुभव येत असता तर ते समजण्यासारखे होते, मात्र आज जगाच्या सपाटीकरणात तो अनुभव सार्वत्रिक होतो आहे. त्यामुळेच अगदी पुनर्जन्माची मांडणी करणाऱ्या भारतीय समाजही त्यात ओढला जातो आहे.

हे असे का होते आहे, याचा विचार केल्यावर लक्षात येते की स्वत:च्या सुरक्षिततेसाठी त्याने ज्या व्यवस्था स्वीकारल्या होत्या, त्यातील काही व्यवस्थांनीच त्याला आता दगा दिला आहे. जसे की सरकार आणि पैसा. सार्वजनिक व्यवस्थेची घडी बसावी म्हणून त्याने सरकारला साथ दिली, मात्र तीच सरकारी व्यवस्था त्याच्या कष्टाचे शोषण करते आहे. ज्या पैशाचा किंवा पैशीकरणाचा त्याने एक अपरिहार्यता म्हणून स्वीकार केला होता, तेच पैसे आज त्याचे रक्त शोषून घेत आहेत. याचा अर्थ असा की काम करणारे घाम गाळत आहेत, उत्पादन सुरु आहे, धान्य पिकविले जाते आहे आणि जगण्यासाठी म्हणून जे जे आवश्यक आहे, ते ते करण्याचा मनोभावे प्रयत्न होतो आहे, तरीही माणूस मात्र हरतो आहे. मानवी प्रतिष्ठा पराभूत होते आहे. सन्मानाने मृत्यू येणे, हे दुर्मिळ झाले आहे. याचा अर्थ मानवी जगण्याचा हेतूच हिरावून घेतला जातो आहे! रसदार उसातून पिळून पिळून रस काढून घेतल्यावर त्याचे जसे चिपाड होते, तसे माणसाचे जगताना चिपाड होते आहे!

जेव्हा आपल्याला कळेल की बहुसंख्य भारतीय नागरिकांचे जीवन अशा पैशीकरणामुळे चिपाड झाले आहे,व्यवस्थेतील काही तांत्रिक दोषांमुळे ते तणावग्रस्त झाले आहेत आणि ते कमी दर्जाचे आयुष्य जगत आहेत, तर आपली काय प्रतिक्रिया होईल? पैसा माध्यम न मानता त्याची वस्तू करून टाकणे, बँकिंगची सुविधा सर्वांना न देणे, व्याजावरील एक शोषण व्यवस्था तयार करून अतिमहाग भांडवलात पिळून काढून जगायला लावणे, चलनात अधिक मूल्यांच्या नोटा अधिक ठेवून ऐतखाऊ, भ्रष्ट जगण्याला प्रतिष्ठा बहाल करणे, सरकार नावाच्या व्यवस्थेला सतत बदनाम करून सार्वजनिक सेवांचे महत्व नाकारणे आणि या सगळ्यातून समाजात लाचारी आणि मुजोरीचे बटबटीत अस्तित्व मान्य करत राहाणे... हे सर्व आपल्यावर काही दोषांनी लादले आहे, हे सर्व आपल्याला कळेल तेव्हा आपल्याला काय वाटेल?

आपण संवेदनशील असाल तर आपल्याला या परिस्थितीची प्रचंड चीड येईल आणि आपल्यातला विचारी माणूस हे दोष कसे दूर करता येतील, यासाठीच्या प्रयत्नात भाग घेईल. अर्थक्रांतीचा विचार करायचा तो त्यासाठी. ज्याला हा विचार करणे, आज झेपते आहे, त्यांच्यासाठी हे आवाहन आहे. त्या दिशेने जाणारा असाच एक प्रयत्न म्हणजे आपल्या सर्वांचे शोषण करणाऱ्या अधिक मूल्याच्या नोटा चलनातून बाद करणे. १०००, ५०० आणि १०० रुपयांच्या या नोटा भारतीय समाज पोखरून काढत आहेत. ते थांबविण्यासाठीची पहिली पायरी म्हणजे हे सर्व ज्या रिझर्व बँकेच्या




अखत्यारीत आहे, तिलाच त्याविषयीचा जाब विचारायचा. तो विचारण्यासाठी येत्या १४ ऑगस्ट रोजी रिझर्व बँकेच्या मुंबई येथील मुख्यालयात गव्हर्नर रघुराम राजन यांच्या भेटीस जायचे आहे. नरेंद्र मोदी, अरुण जेटली,रघुराम राजन आणि सर्व अर्थतज्ञ असे सर्वच म्हणतात की ५० रुपयांपेक्षा अधिक मूल्याच्या नोटा व्यवहारात नको आहेत, तर मग तसे करण्यात काय अडचण आहे, हे आपण राजन यांना विचारणार आहोत आणि त्याविषयीचे पुढील धोरण काय आहे, हे १२६ कोटी भारतीयांना जाहीरपणे सांगण्याचा आग्रह करणार आहोत.

मानवी प्रवासाला सकारात्मक वळण देणाऱ्या एका ऐतिहासिक अशा या पुढाकारात वैयक्तिक सामाजिक जबाबदारी (PSR) म्हणून आपले स्वागत आहे.

**(अधिक माहितीसाठी पान ६ व ७ पाहा)**

---

## अर्थपूर्ण मासिकाचा पत्ता आणी फोन नंबर कृपया नोंद घ्यावी

**'अर्थपूर्ण' कार्यालयाचा पत्ता बदलला असून तो पुढील प्रमाणे आहे.**

११, 'हर्षदा', रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे ४११०३८

(पालवी हॉटेल आणि स्टेट बँकेच्या मागील रस्ता )

(एमआयटी रोडच्या सुरवातीसच डावीकडे वळणे)

**तसेच 'अर्थपूर्ण' कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक असाः ०२०-२५४३०५४०**